33

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२८२१२६९.
ई-मेल पत्ता : headquarters@mjp.gov.in
वेब पत्ता : mahamjp.com

**परिपत्रक क्र.१७१**

**विषय** : पाणी पुरवठा केंद्रामध्ये क्लोरिनेशन वापरासंबंधी घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

पाणी पुरवठा केंद्रांच्या पाहणीच्या वेळी असे आढळून आले की, क्लोरीन गॅस गळती झाल्यानंतर क्लोरिनेशनचे संयंत्रे हाताळणीसाठी मास्क उपलब्ध असूनही, संबंधित कर्मचाऱ्यांना मास्क वापरता येत नाही/ माहित नाही. क्लोरिन गॅस हा फुफ्फुसास व डोळ्यांना अत्यंत हानीकारक आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करता, क्लोरिन गॅस/लिक्वीडच्या गळतीच्या वेळेस संयंत्रे हाताळताना कर्मचाऱ्यांनी मास्क वापरणे अत्यंत आवश्यक आहे. या बाबतीत पुढीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

- पाणी पुरवठा केंद्रातील संबंधीत कर्मचाऱ्यांनी क्लोरीन गॅसची गळती झाल्यास मास्क व ग्लोव्हजचा वापर काटेकोरपणे करावा.
- क्लोरिन साठवणूक व हाताळणीबाबत तसेच इतर रसायनांच्या हाताळणीबाबत CPHEEO मॅन्युअल मध्ये नमूद केलेल्या सर्व सुरक्षिततेच्या उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- पाणी पुरवठा केंद्राशी संबंधीत उप अभियंता यांनी दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी पाणी पुरवठा केंद्रामध्ये भेट देवून मास्क व ग्लोव्हजची Mock Drill करावी. तसेच याबाबत नोंदवहीत नोंद घेण्यात यावी.
- संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी पाणी पुरवठा केंद्राला भेट देताना, ही नोंदवही वेळोवेळी तपासावी व दक्षता घेत असल्याची खात्री करावी.
- काही ठिकाणी क्लोरिन गॅस डिटेक्शनसाठी सेंसर लावण्यात आले आहे पण बंद पडलेले आहे. तरी ज्याठिकाणी क्लोरिन गॅसचे लिक डिटेक्शनसाठी सेंसार लावण्यात आले, सेंसार कार्यरत आहे किंवा नाही हे न चुकता दर महिन्यात तपासावे.

(कृ.मा.प.)

वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. या सूचनांचे पालन न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर म.ना.से. नियमामधील तरतूदीनुसार प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

मुंबई-२१
रवाना
सही 29.12.15

(संतोष कुमार)
**सदस्य सचिव**

**जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/१४३५**
**दि.२९ डिसेंबर, २०१५**

**प्रत माहिती व अनुपालनाच्या कार्यवाहीसाठी :**

- संचालक (तांत्रिक) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे / पुणे / नाशिक / औरंगाबाद /नागपूर / अमरावती.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, म.नि.सं. व सं. कक्ष, ठाणे
- अधीक्षक अभियंता, गु.प.प., महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/ पुणे/ सांगली/औरंगाबाद/लातूर/नांदेड/नाशिक/अहमदनगर/अमरावती/अकोला /नागपूर/चंद्रपूर.
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वि., ठाणे/ अंबरनाथ (जव्य)/ विरार (जव्य)/ पनवेल (जव्य)/ माणगांव/ रत्नागिरी/ओरस कणकवली/ पुणे-१/ पुणे-२/ कराड/ सातारा (जव्य)/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ औरंगाबाद / बीड/ जालना / लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड/ परभणी/ जळगाव/ नाशिक/नाशिक (जव्य)/अहमदनगर/संगमनेर/अमरावती/ अमरावती (जव्य)/ यवतमाळ/ अकोला/ वाशिम / बुलढाणा/ नागपूर/ नागपूर (जव्य)/ गोंदिया/ चंद्रपूर/ वर्धा.